सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ८८ | शुक्रवार, दि. १९ डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## आजचे अभीष्टचिंतन



**श्री. ईश्वर अग्रवाल**
संचालक : अग्रवाल हॉटेल



**श्री. शरद पाटील**
पोलीस



**श्री. भटूसिंग तोमर**
पोलीस



**श्री. रावसाहेब पाटील**
डायरेक्टर : फ्लाय प्रा.लि.,



**श्री. विशाल अग्रवाल**
संचालक : अग्रवाल दुध डेअरी

# चोरट्यांनी एका रात्रीत फोडली सात दुकाने

## तीन गुन्हे दाखल; सुमारे ५४ हजारांचा ऐवज लंपास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**अमळनेर : येथील आठवडे बाजार परिसरात चोरट्यांनी एकाच रात्री सात दुकाने फोडली आहेत. ही घटना बुधवार, दि. १७ डिसेंबर रोजी रात्री ८ ते गुरुवार, दि. १८ डिसेंबर रोजी पहाटे पाच वाजेच्या सुमारास घडली. मात्र, याप्रकरणी तीनच दुकानदारांनी फिर्याद दिल्याने पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. सुमारे ५४ हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास झाला आहे.**



### चोरटा सीसीटीव्ही कॅमेरात कैद!

घटनास्थळी पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, गणेश पाटील, प्रशांत पाटील, उज्वल म्हस्के, विनोद संदानशीव, उदय बोरसे यांनी भेट देऊन पंचनामे केले. चोरटा सिसीटीव्ही कॅमेरात कैद झाला आहे. एलसीबी पोलीस तपासासाठी अमळनेरात दाखल आले आहेत.



उर्वरीत चार दुकानदारांपैकी दोन दुकानदारांकडे यापूर्वीही चोरी झाल्याने त्यांनी गुन्हे दाखल केलेले नाहीत. उर्वरीत दोन दुकानदार गुन्हा दाखल करण्यास धजावले नाहीत. या घटनेने बाजारपेठेत खळबळ उडाली आहे. चोरट्यांचा तत्काळ बंदोबस्त करावा, अशी मागणी व्यापाऱ्यांमधून होत आहे.

पोलिसांनी सांगितले, की शहरातील अब्दुल मणियार यांचे आठवडे बाजारातील गुरु नानक शॉपीमध्ये रिंगल मोबाइल नावाचे दुकान आहे. गुरुवार, दि. १८ डिसेंबर रोजी पहाटे ५ वाजता मधुकर चौधरी (रा. अमळनेर) यांनी त्यांना मोबाईलवर संपर्क साधून दुकानाची कुलपे तोडलेली असल्याची माहिती दिली. त्यानंतर त्यांनी त्यांच्या भावासह दुकान गाठले. दुकानात दिवे सुरू अवस्थेत आढळले. काउंटरमध्ये ठेवलेली स्टीलची पेटी व त्यातील ३० हजार रुपये रोख, तसेच ओप्पो, विवो, एमआय, पोको कंपनीचे अँड्रॉइड मोबाइल व मोबाइल ॲक्सेसरीज (अंदाजे १७ हजार रुपये) चोरी झाल्याचे निष्पन्न झाले. दुसऱ्या घटनेत याच परिसरातील श्री दुर्गा टी डेपोचे मालक सुरेश सतरामदास बठेजा यांच्या दुकानातून २ हजार रुपये चिल्लर, जुनी बडोदा बँक जवळील मयूर मोबाइल दुकानाचे मालक भूषण भाईदास महाजन यांच्या दुकानातून ५ हजार ५०० रुपयांची मोबाइल ॲक्सेसरीज चोरीस गेल्याचेही निदर्शनास आले. या प्रकरणी येथील पोलीस ठाण्यात चोरट्यांविरूद्ध गुन्ह्याची नोंद झाली आहे. पोलीस हेड कॉन्स्टेबल विनोद भोई व नाना पवार तपास करीत आहेत. एकाच सात दुकाने फोडल्याने व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण आहे. बाजारपेठांमध्ये पोलिसांनी रात्रपाळीची गस्त वाढवावी, अशी मागणी होत आहे.

माझे दुकान दोन वर्षांत तिसऱ्यांदा फोडण्यात आले आहे. दुकानातील कॉपरची चोरी झाली होती. यावेळी देखील स्क्रॅप मटेरियल चोरीला गेले आहे. मात्र, मागील गुन्ह्याचा अद्याप तपास लागलेला नसल्याने आणि गुन्हा दाखल करूनही काही ठोस कारवाई होत नसल्याने यावेळी गुन्हा दाखल केलेला नाही.
**–सय्यद इद्रीस,** सना इलेक्ट्रॉनिक्स, अमळनेर.

माझ्या दुकानाचे कुलूप तोडून चोरट्यांनी टीव्हीवर दगड मारून नुकसान केले आहे. शहरातील बाजारपेठेत अशा घटना वारंवार घडत असतात. मात्र, अशा घटनांचा तपास लागतच नाही. चोरटे मोकाट फिरतात. काहीएक उपयोग होत नसल्याने त्यामुळे मी आता गुन्हा दाखल केलेला नाही.
**–शिवाजी सोनार,** पीजी टेलर, अमळनेर

आजपर्यंत माझे दुकान तीन वेळा फोडण्यात आले आहे. आज पुन्हा चौथ्यांदा दुकान फोडण्यात आले आहे. सुमारे चार ते पाच हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. गुन्हे दाखल करून उपयोग नसतो.
**– सुधाम शिंपी,** सुविधा मोटर रिवायडिंग

दुकानाचे लॉक तोडण्यात आले आहे. मात्र, कोणत्याही प्रकारचे सामान चोरीला गेलेले नाही. विशेष नुकसानही झालेले नाही. त्यामुळे गुन्हा दाखल केलेला नाही.
**– बालकृष्ण सूर्यवंशी,** गायत्री हेअर.

# ई–पीक पाहणी नोंदीसाठी ऑफलाइन सुविधा उपलब्ध

## अमळनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना अर्ज करण्याचे आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : खरीप हंगाम २०२५ मध्ये विविध पिकांची ई–पीक पाहणी नोंद न झालेल्या शेतकऱ्यांना शासनाने दिलासा दिला आहे. ऑनलाईन नोंद न होऊ शकलेल्या शेतकऱ्यांसाठी आता ऑफलाइन ई–पीक पाहणी अर्ज स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, अशी माहिती तहसीलदार रूपेशकुमार सुराणा यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे, की शासन निर्णयानुसार १४ डिसेंबर २०२५ अन्वये ज्या शेतकऱ्यांना ऑनलाईन ई–पीक पाहणी नोंद करणे शक्य झाले नाही, अशा शेतकऱ्यांकडून ऑफलाइन पद्धतीने अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. अमळनेर तालुक्यातील सर्व संबंधित शेतकऱ्यांनी आपल्या ग्राम महसूल अधिकाऱ्यांकडे आवश्यक कागदपत्रांसह ऑफलाइन ई–पीक पाहणी अर्ज सादर करावेत. ऑफलाइन अर्जांच्या आधारे तपासणी व मंजुरी प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. यासाठी वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे.

ई–पीक पाहणी नोंद झाल्यास शेतकऱ्यांना शासनाच्या विविध कृषी योजना, मदत व लाभ मिळण्यास सुलभ होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी दिलेल्या मुदतीत ऑफलाइन अर्ज सादर करावेत.

**वेळापत्रक**

- १७ डिसेंबर ते २४ डिसेंबर २०२५ : शेतकऱ्यांनी ग्राम महसूल अधिकाऱ्याकडे अर्ज सादर करणे.
- २५ डिसेंबर २०२५ ते ७ जानेवारी २०२६ : ग्रामस्तरीय समितीकडून पडताळणी
- ८ जानेवारी २०२६ ते १२ जानेवारी २०२६ : स्थळ पाहणी अहवाल उपविभागीय स्तरीय समितीकडे सादर करणे.
- १३ जानेवारी २०२६ ते १५ जानेवारी २०२६ : उपविभागीयस्तरीय समितीने सदर अवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करणे.

# आंबेडकर चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीच्या सल्लागारपदी मिलिंद चौधरी यांची नियुक्ती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : तालुक्यातील अमळगाव येथील मूळ रहिवासी मिलिंद चौधरी यांची आंबेडकर चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीच्या सल्लागारपदी नियुक्ती झाली आहे. त्यांच्या नियुक्तीने खानदेशच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

श्री. चौधरी यांच्यावर चेंबरच्या सर्वांगीण विकासासाठी, प्रशासन बळकटीसाठी तसेच दीर्घकालीन मूल्यनिर्मितीसाठी धोरणात्मक दिशानिर्देश व तज्ज्ञ सल्ला देण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. आंबेडकर चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री ही एक राष्ट्रीय स्तरावरील व्यावसायिक संघटना आहे. समावेशन, सक्षमीकरण आणि आर्थिक न्यायाच्या माध्यमातून भारताच्या उद्योजकीय परिदृश्यात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी ही संघटना कटिबद्ध आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दूरदृष्टी, बुद्धिमत्ता आणि सुधारणावादी विचारधारेतून प्रेरणा घेऊन, चेंबर समान संधींची व्यवसाय परिसंस्था निर्माण करण्यासाठी कार्यरत आहे. या परिसंस्थेत जात, समुदाय किंवा सामाजिक पार्श्वभूमी काहीही असली तरी प्रत्येक व्यक्तीला सहभागी होता यावे, प्रगती करता यावी आणि नेतृत्व करता यावे, हा चेंबरचा उद्देश आहे. भारतातील आर्थिक संधींचे लोकशाहीकरण करण्यासाठी आंबेडकर चेंबर कार्यरत आहे. उद्योगजगत, सरकारी यंत्रणा, वित्तीय संस्था आणि उपेक्षित उद्योजक यांच्यातील दरी भरून काढण्याठी एक सक्षम पूल म्हणून चेंबर काम करते. श्री. चौधरी हे गेल्या दहा वर्षांपासून डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम इंटरनॅशनल फाऊंडेशनचे सचिव म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या अनुभवाची दखल घेऊन आंबेडकर चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीने त्यांच्यावर सल्लागारपदाची अतिरिक्त जबाबदारी सोपवली आहे.

## दिनविशेष

१९ डिसेंबर

- राम प्रसाद बिस्मिल, रोशन सिंग आणि अशफाकुल्ला खान या क्रांतिकारकांना ब्रिटीश सरकारने फाशी दिली.
- दमण आणि दीव हे पोर्तुगीज–व्याप्त प्रदेश भारतात समाविष्ट करण्यात आले.
- गोवा मुक्ती दिन.
- व्ही. एन. खरे यांनी भारताचे 33 वे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारला.

# गायी कत्तलीसाठी न देता गो–माता फाउंडेशनला द्या!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पंढरपूर येथील गोमाता फाऊंडेशनतर्फे गो हत्या होऊ नये यासाठी नवीन उपक्रम सुरू केला आहे. राज्यातील शेतकऱ्यांसह पशुपालकांना गायी कत्तलीसाठी न देता फाऊंडेशनकडे द्यावीत. बाजारभावापेक्षा एक हजार रुपये जास्त देण्यात येतील. गोशाळेत गायींचा सांभाळ केला जाईल, असे आवाहन त्यांनी केले आहे. याबाबत त्यांनी जिल्ह्यातील गो भक्तांच्या नावांसह मोबाईलवर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

**जिल्हानिहाय संपर्कासाठी नावे व कंसात मोबाईल क्रमांक असे–**

विशाल भंडारे (सोलापूर, 7666796643), शशांक जैन ( संभाजीनगर 8888889584), गणेश वाघ (पंढरपूर 8282824209), समर्थ गेजगे (मिरज 8956394011), शुभम जोशी (सांगली 8329205375), विशाल चव्हाण (नाशिक 8181819484), हेमंत शेळके (सातारा 8459644178), उमेश खटकाळे (नाशिक 8788926596), अभिजीत भंडारे ( सातारा 7499235614), नीलेश भंडारे (सातारा 7499692100), विशाल साळुंखे (सातारा 8551889662), भाई राणे (विरार 9657400969), आनंद जगताप (7875788398 जळगाव).

# अशी सोडवा स्मार्टफोन गरम होण्याची समस्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चार्जिंग करताना स्मार्टफोनचा वापर करणे टाळा. बॅकग्राऊंड ॲप्स स्मार्टफोनमध्ये सुरू असणारे बॅकग्राऊंड ॲप्स बंद करा. अनेक ॲप्स स्मार्टफोनमध्ये एकाच वेळी अनेक ॲप्स वापरत असाल तर तुमचा फोन गरम होऊ शकतो. यासाठी काही टिप्स जाणुन घेऊया...

**हेवी गेमिंग :** स्मार्टफोनमध्ये दीर्घकाळासाठी हेवी गेमिंगचा वापर करू नका.

**स्मार्टफोनची ब्राईटनेस :** गरज नसेल तेव्हा तुमच्या स्मार्टफोनची ब्राईटनेस कमी ठेवा

**स्मार्टफोनची हिट :** कव्हरमुळे तुमच्या स्मार्टफोनमध्ये हिट वाढते.

**लोकल चार्जर :** डुप्लिकेट किंवा लोकल चार्जरचा वापर केल्यास स्मार्टफोन गरम होऊ शकतो. **नेटवर्क समस्या :** तुमच्या स्मार्टफोनमध्ये नेटवर्क समस्या येत असेल तर स्मार्टफोन गरम होऊ शकतो.

'हाय पॉवर' हेडलाईट्समुळे अपघातांचा धोका
पान ३ वर



## गौरव कोठावदे यांचे 'एमएस' परीक्षेत यश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील गौरव कोठावदे यांनी ऑस्ट्रेलिया येथील ऑकलंड विद्यापीठातून 'एमएस' पदवी प्राप्त केली आहे. सामाजिक कार्यकर्त्या सौ. मंदाताई कोठावदे व साखरेचे व्यापारी महेश कोठावदे यांचा तो कनिष्ठ चिरंजीव आहे. त्यांच्या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

# सर्वसमावेशक भारतासाठी अल्पसंख्याक विकास महत्वाचा

## प्रा. विजय साळुंखे; प्रताप महाविद्यालयात अल्पसंख्याकदिन उत्साहात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अल्पसंख्याक समाज व नेतृत्वाचे योगदान हे प्राचीन काळापासून आढळून येते. यात जैन, बोद्ध, पारशी, शीख, मुस्लिम बांधवांचे साहित्य, नेतृत्व व दायित्व राष्ट्रास दिशा देणारे होते. अल्पसंख्याक समाजाची भाषिक व धार्मिक आधारावर विभागणी आढळते. म्हणूनच सर्वसमावेशक भारतासाठी अल्पसंख्याक विकास महत्वाचा आहे, असे प्रतिपादन प्रा. विजय साळुंखे यांनी केले.

येथील खानदेश शिक्षण मंडळ संचलित प्रताप महाविद्यालयांतर्गत करिअर कौन्सिलिंग सेंटरमध्ये गुरुवार, दि. १८ डिसेंबर रोजी झालेल्या अल्पसंख्याक दिनानिमित्त प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव अध्यक्षस्थानी होते. उपप्राचार्य डॉ. अशोक पाटील, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रमुख डॉ. हेमंत पवार प्रमुख पाहुणे होते. प्रा. साळुंखे पुढे म्हणाले, की अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी भारत सरकारच्या विविध योजना आहेत. यामागचे एक महत्वाचे कारण म्हणजे भेदभाव निर्मूलन आपले नैतिक दायित्व आहे. त्यांच्या



विकासासाठी भारतीय राज्यघटनेत अनुच्छेद २५ ते २८ मध्ये तरतूद करण्यात आली आहे. अल्पसंख्याक समुदायाचा सामाजिक सुरक्षितता व समान संधीद्वारे विकास साधता येतो. यासाठी संविधानिक मूल्यांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव म्हणाले, की सीसीएमसी विभागाचे मूळ नाव अल्पसंख्याकशी संबंधित होते. दादाभाई नवरोजी, मौलाना आझाद, मनमोहनसिंग यांचे योगदान महत्त्वाचे आहे. आपला देश हा विविध विचारांनी व्यापलेला आहे. भारतात महिला व पुरुष या दोनच जाती अस्तित्वात आहेत. करिअर कौन्सिलिंग सेंटरचे प्रमुख डॉ. विजय तुंटे, उपप्राचार्य डॉ. व्ही. बी. मांटे, डॉ. जितेंद्र पाटील, डॉ. विवेक बडगुजर, प्रा. रामदास सुरळकर, डॉ. प्रियांका पाटील, प्रा. अमोल अहिरे, प्रा. सोनूसिंग पाटील, प्रा. सचिन आवटे, डॉ. आकाश गव्हाणे, प्रा. भिका पावरा यांच्यासह सीसीएमसी विभागाचे पराग रवींद्र पाटील, नंदूसिंग पाटील, अतुल धनगर, विशाल अहिरे, योगेश चिंचोरे, दितेश चिंचोरे, धिरज चौधरी, प्रिया बोरसे, आफ्रिन पठाण, पाटील निकिता, पाटील भावना, पाटील श्वेता, चैताली चौधरी, रिद्धी राठोड, तेजस्विनी पाटील, अक्षय सोनवणे लक्ष्मी पाटील, मोहित पाटील, मयुरी पाटील, गायत्री पाटील, रोशनी बाविस्कर, दीपाली पाटील, नंदिनी पाटील आदी उपस्थित होते. डॉ. हेमंत पवार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रमोद चौधरी यांनी आभार मानले.

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

लग्नसराईचा हंगाम सुरू झाला की शहरापासून गावापर्यंत बाजारपेठ गजबजून जाते. प्रत्येक घरात लग्नाची तयारी सुरू होते. कपडे, दागिने, हॉल बुकिंग, जेवण, सजावट, वाहन व्यवस्था अशा अनेक गोष्टींची खरेदी आणि बुकिंग केली जाते. मात्र आजच्या काळात लग्न म्हणजे केवळ आनंदाचा सोहळा न राहता मोठा आर्थिक भारही बनला आहे. वाढती महागाई तर आहेच, पण त्यासोबतच जवळपास प्रत्येक वस्तू आणि सेवांवर लागणारा वस्तू व सेवा कर म्हणजेच जीएसटी हा खर्च आणखी वाढवतो. त्यामुळे लग्न तुमचे असले तरी त्यातून सरकारच्या तिजोरीत मोठ्या प्रमाणात कररूपी आहेर जमा होतो, अशी भावना अनेक कुटुंबांतून व्यक्त केली जात आहे.

### लग्नामध्ये कसा आकारला जातो जीएसटी?

विवाह समारंभ हा वर आणि वधूच्या कुटुंबासाठी आयुष्यातील मोठा प्रसंग असतो. या सोहळ्यासाठी लोक मुक्तहस्ताने खर्च करतात. पूर्वी साधेपणाला जास्त महत्त्व दिले जात होते, मात्र आता लग्नाचा थाट वाढत चालला आहे. महागडे कपडे, जड दागिने, आकर्षक सजावट, आलिशान हॉल आणि चविष्ट जेवण याकडे विशेष लक्ष दिले जाते. या सर्व गोष्टींवर जीएसटी लागू असल्यामुळे एकूण खर्चात मोठी भर पडते. लग्नासाठी लागणारे कपडे असोत किंवा दागिने, मंगल कार्यालयाचे भाडे असो किंवा केटरिंग सेवा, प्रत्येक ठिकाणी कर आकारला जातो.सोन्या-चांदीच्या दागिन्यांशिवाय लग्न अपूर्णच मानले जाते. लग्नसराईत दागिन्यांची खरेदी मोठ्या प्रमाणात होते. सोन्याच्या दागिन्यांवर तीन टक्के जीएसटी आकारला जातो. हा टक्का कमी वाटला तरी खरेदीची रक्कम मोठी असल्यामुळे कराची रक्कमही लक्षणीय ठरते. सराफ व्यावसायिकांच्या मते, लग्नसराईच्या काळात दागिन्यांच्या विक्रीतून सरकारला मोठ्या प्रमाणात जीएसटी मिळतो. त्याचप्रमाणे कपड्यांवर पाच ते बारा टक्यांपर्यंत जीएसटी आकारला जातो. नवरीचे खास कपडे, वराचा पोशाख, नातेवाईकांसाठी खरेदी हे सर्व खर्च वाढवणारे ठरतात.मंगल कार्यालय, हॉटेल किंवा लॉन बुक करताना अठरा टक्के जीएसटी द्यावा लागतो. पूर्वी गावात किंवा घराजवळ साध्या पद्धतीने लग्न केले जात होते. आता मात्र मोठ्या हॉलमध्ये, सजावटीसह समारंभ करण्याकडे लोकांचा कल वाढला आहे. केटरिंग, डेकोरेशन, लाईटिंग, फोटोग्राफी आणि व्हिडिओग्राफी या सर्व सेवांवरही अठरा टक्यांपर्यंत जीएसटी आकारला जातो. त्यामुळे एकाच लग्नात अनेक ठिकाणी कर भरावा लागतो.
वऱ्हाडीच्या प्रवासाचा खर्चही



# हिशेब GST% चा

## लग्नात एक लाख खर्च केल्यास २० हजार जातात सरकारला! पहा लग्नातील जीएसटीचा हिशोब

आता वाढला आहे. काही वर्षांपूर्वी वऱ्हाडीसाठी टेम्पो किंवा साधी वाहने वापरली जात होती. आता मात्र आरामदायी बस, कार आणि आलिशान वाहनांची मागणी वाढली आहे. इंधनाचे वाढते दर यामुळे प्रवासाचा खर्च आधीच जास्त झाला आहे. त्यात वाहन भाड्यावर अप्रत्यक्षपणे कराचा भारही येतो. त्यामुळे वराच्या कुटुंबाचा खर्च दिवसेंदिवस वाढत चालला आहे. एकंदरीत पाहता जर एखाद्या लग्नासाठी एक लाख रुपये खर्च केले, तर त्यामधून तीन हजारांपासून ते वीस हजार रुपयांपर्यंतची रक्कम जीएसटीच्या माध्यमातून सरकारकडे जाते. म्हणजेच लग्नाचा आनंद घेत असताना सरकारचा महसूलही वाढतो. त्यामुळे अनेक जण असे म्हणतात, की लग्न तुमचे असते, खर्च तुमचा असतो, पण त्यातून सरकारला मोठा कररूपी आहेर मिळतो.

### तुमचाही तुमच्या घरात नवा टीव्ही घेण्याचा प्लॅनिंग आहे?

नवीन वर्षाची सुरुवात होताच म्हणजेच जानेवारी २०२६ पासून तुमच्या घरातील एक महत्त्वाची वस्तू महाग होणार असून त्यामुळे तुमच्या बजेटवर थेट परिणाम होऊ शकतो आणि ही वस्तू म्हणजे एलईडी टीव्ही आणि स्मार्ट टीव्ही, सध्या अनेक घरांमध्ये नवीन टीव्ही घेण्याची तयारी सुरू असते, काही जण सणासाठी थांबलेले असतात तर काही जण नवीन वर्षात अपग्रेड करण्याचा विचार करतात, मात्र आता समोर आलेल्या माहितीनुसार जानेवारीपासून टीव्हीच्या किमतींमध्ये ३ ते १० टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची शक्यता आहे आणि यामागचे कारण केवळ एक नाही तर अनेक महत्त्वाचे घटक आहेत.

### टीव्हीच्या किमती वाढण्यामागील प्रमुख कारण?

सर्वात मोठे कारण म्हणजे टीव्ही तयार करण्यासाठी लागणाऱ्या सेमीकंडक्टर आणि मेमरी चिप्सचा जागतिक पातळीवर निर्माण झालेला तुटवडा, आजच्या आधुनिक टीव्हीमध्ये चित्र स्पष्ट दिसण्यासाठी, इंटरनेट वापरण्यासाठी आणि स्मार्ट फीचर्स सुरळीत चालण्यासाठी मोठ्या प्रमाणात मेमरी चिप्स वापरल्या जातात, मात्र सध्या या चिप्सचा पुरवठा कमी आणि मागणी प्रचंड वाढलेली आहे, विशेषतः आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच एआयसाठी लागणाऱ्या हाय स्पीड मेमरी चिप्सची मागणी जगभरात वाढली आहे, त्यामुळे चिप तयार करणाऱ्या कंपन्या जास्त नफा मिळणाऱ्या एआय चिप्सकडे वळल्या असून टीव्हीसाठी वापरल्या जाणाऱ्या जुन्या प्रकारच्या चिप्सचा पुरवठा कमी झाला आहे, याचा थेट परिणाम म्हणजे चिप्सच्या किमतीत प्रचंड वाढ झाली आहे, काही कंपन्यांच्या मते गेल्या तीन महिन्यांत काही मेमरी चिप्सच्या किमती ५०० टक्क्यांपर्यंत वाढल्या आहेत, तर काही प्रकारच्या चिप्सच्या किमतीत तब्बल १००० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च वाढल्यामुळे टीव्ही उत्पादक कंपन्यांना दरवाढ करणे भाग पडत आहे, याशिवाय आणखी एक मोठे कारण म्हणजे भारतीय रुपयाची घसरण, अलीकडेच डॉलरच्या तुलनेत रुपयाची किंमत ९० रुपयांच्या पातळीवर पोहोचली आहे. त्यामुळे परदेशातून आयात होणारे ओपन सेल, मदरबोर्ड, चिप्स आणि इतर इलेक्ट्रॉनिक पार्ट्स खूप महाग झाले आहेत, टीव्ही उत्पादनासाठी भारताला अजूनही मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून राहावे लागते, त्यामुळे रुपया कमजोर झाला की त्याचा फटका थेट ग्राहकांना बसतो, काही वर्षांपूर्वी सरकारने टीव्हीवरील जीएसटी २८ टक्क्यांवरून १८ टक्क्यांवर आणला होता, त्यावेळी ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला होता आणि टीव्हीच्या किमती साधारण ४ ते ५ हजार रुपयांनी कमी झाल्या होत्या, मात्र आता होणारी ही नवीन दरवाढ त्या जीएसटी कपातीमुळे मिळालेला फायदा जवळपास संपवून टाकण्याची शक्यता आहे, अनेक टीव्ही कंपन्यांनी याबाबत आपल्या डिलर्सना आधीच सूचित केले असून जानेवारीपासून नवीन स्टॉक वाढीव किमतीत येण्याची शक्यता आहे, कंपन्यांच्या मते सुरुवातीला ३ ते ४ टक्के दरवाढ होईल, मात्र मेमरी चिप्सच्या किमती जशा वाढत जातील तशी ही वाढ ७ ते १० टक्क्यांपर्यंत जाऊ शकते, म्हणजेच आज जो टीव्ही ३० हजार रुपयांना मिळतो तो पुढील वर्षी ३२ ते ३३ हजार रुपयांपर्यंत जाऊ शकतो, विशेषतः मोठ्या स्क्रीनचे आणि प्रीमियम स्मार्ट टीव्ही जास्त महाग होण्याची शक्यता आहे. तज्ज्ञांच्या मते हा चिप्सचा तुटवडा किमान एप्रिल ते जून २०२६ पर्यंत कायम राहू शकतो आणि त्यानंतरच परिस्थितीत थोडी सुधारणा होईल. त्यामुळे जर तुम्ही नवीन टीव्ही घेण्याचा विचार करत असाल तर जानेवारीपूर्वी खरेदी करणे अधिक फायद्याचे ठरू शकते, कारण सध्या चालू असलेल्या ऑफर्स आणि सवलतींचा फायदा घेतल्यास तुम्ही हजारो रुपये वाचवू शकता. एकूणच पाहता नवीन वर्षात टीव्ही महाग होणार हे जवळपास निश्चित असून घरगुती खर्च वाढू नये, असे वाटत असेल तर वेळेत निर्णय घेणे तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते.



# औरंगजेबने तळ ठोकला, इंग्रजांनी तुरुंग बनवला

## वाचा ८०० वर्षांचा इतिहास असणाऱ्या ' या ' भुईकोट किल्ल्याची शौर्यगाथा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सोलापूर शहराच्या मध्यभागी असलेला हा भुईकोट किल्ला महाराष्ट्रातील अत्यंत महत्त्वाच्या आणि मजबूत मैदानी किल्ल्यांपैकी एक आहे. या किल्ल्याचा इतिहास अनेक राजवटींच्या साक्षीने समृद्ध आहे.

### किल्ल्याचा मूळ संस्थापक

सोलापूर किल्ल्याची स्थापना बहमनी राजवटीच्या काळात झाली, परंतु किल्ल्याच्या उभारणीत महत्त्वपूर्ण योगदान हे यादव आणि शिलाहार राजघराण्यांचे होते. हा किल्ला मूळतः एक गढी म्हणून बांधला गेला होता.

### पहिला विस्तार

किल्ल्याच्या बांधणीचा मोठा विस्तार आणि मजबुतीकरण आदिलशाही राजवटीत करण्यात आले.



या काळातच किल्ल्याला सध्याची मजबूत तटबंदी आणि खंदकाचे स्वरूप प्राप्त झाले.

### शिवाजी महाराजांचा अप्रत्यक्ष संबंध

छत्रपती शिवाजी महाराजांनी दख्खनमधील मोहिमेशिवाय, त्यांच्या राजकीय आणि लष्करी हालचालींदरम्यान हा प्रदेश महत्त्वाचा होता. हा किल्ला महाराजांच्या हालचालींच्या मार्गावर होता आणि त्यांनी या प्रदेशावर आपले लक्ष केंद्रित केले होते.

### औरंगजेबाचा तळ

औरंगजेब याने दक्षिणेतील मोहिमेशिवाय या किल्ल्याचा उपयोग तळ ठोकण्यासाठी केला होता. यावरून या किल्ल्याचे दख्खनच्या राजकारणातील मोक्याचे स्थान सिद्ध होते.

### पेशव्यांच्या ताब्यात

१८ व्या शतकात मराठा साम्राज्याची सत्ता वाढल्यानंतर हा किल्ला पेशव्यांच्या नियंत्रणाखाली आला. पेशव्यांनी या किल्ल्याचे महत्त्व कायम राखले आणि लष्करीदृष्ट्या तो मजबूत ठेवला.

### बेसाल्ट दगडाची तटबंदी

हा किल्ला त्याच्या मजबूत आणि प्रभावी बांधकामासाठी ओळखला जातो. या किल्ल्याची तटबंदी स्थानिक बेसाल्ट दगडापासून बांधलेली असून, त्याला चारी बाजूंनी पाण्याचा खंदक आहे. हा खंदक किल्ल्याला अतिरिक्त संरक्षण प्रदान करतो.

### प्रसिद्ध सिद्धेश्वर मंदिर

किल्ल्याच्या आत सिद्धेश्वर मंदिर आहे, जे सोलापूरकरांचे श्रद्धास्थान आहे. यामुळे किल्ल्याला धार्मिक आणि ऐतिहासिक दोन्ही महत्त्व प्राप्त झाले आहे. या मंदिरामुळेच किल्ल्याला 'सोलापूर किल्ला' असे नाव पडले असावे, असे मानले जाते.

### १८१८ मध्ये ब्रिटिश नियंत्रण

१८१८ मध्ये मराठा साम्राज्याच्या पराभवानंतर हा किल्ला ब्रिटिशांच्या ताब्यात गेला. इंग्रजांनी या किल्ल्याचा उपयोग मुख्यत्वे प्रशासकीय केंद्र आणि काही काळ तुरुंग म्हणून केला.

# अंबानींच्या शाळेत शिकवतात किती शिक्षक? पगार किती?

## कशी मिळते ॲडमिशन ? जाणून घ्या एका क्लिकवर

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

मुकेश अंबानींच्या धीरूभाई अंबानी इंटरनॅशनल स्कूलमध्ये सेलिब्रिटींची मुले शिकतात. ऐश्वर्या राय, करीना कपूर, शाहरूख खान,शाहिद कपूर पासून ते सचिन तेंडुलकरपर्यंत अनेक सेलिब्रिटींच्या मुलांनी इथेच शिक्षण घेतले. मात्र या शाळेत शिक्षक किती आहेत, शाळेत कोणकोणत्या सुविधा आहेत, जाणून घेऊया ए टू झेड माहिती. आशियातील सर्वांत श्रीमंत व्यक्ती अशी ओळख असलेले मुकेश अंबानी आणि संपूर्ण अंबानी परिवार नेहमी चर्चेत असतो. त्यांचा बिझनेस तर सर्वदूर पसरला आहेच, पण त्यांची एक शाळाही आहे. जेथे देशातील अनेक दिग्गज व्यक्ती, तसेच बॉलिवूड सेलिब्रिटींची मुलंही शिकत असतात. या शाळेत अमिताभ बच्चन यांची नात आराध्या, शाहरुख खानचा मुलगा, करीना-सैफचा मुलगा शिकतो, तसेच करण जोहर याची मुले, क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरची लेक सारानेही याच



शाळेत शिक्षण घेतले होते. जाणून घेऊनाय धीरूभाई अंबानी स्कूलबद्दल विशेष माहिती.

मुकेश अंबानी यांनी सुरू केलेली धीरूभाई अंबानी इंटरनॅशनल स्कूल सर्वश्रुत आहेच. अंबानी कुटुंबातील सर्व मुलंही याच शाळेत शिकली आहेत.या शाळेबद्दल काही खास गोष्टी जाणून घेऊया. रिपोर्ट्सनुसार, धीरूभाई अंबानी स्कूलमध्ये फक्त १०८७ मुले शिकतात आणि त्यांना शिकवणारे शिक्षक आहेत १८७. म्हणजेच प्रत्येक ६ विद्यार्थ्यांमागे असतो १ शिक्षक.

या शाळेच्या कँटीनचा मेन्यू प्रसिद्ध शेफ संजीव कपूर यांनी तयार केला आहे. तर शाळेचा युनिफॉर्म डिझाईन केला आहे प्रसिद्ध डिझायनर मनिष मल्होत्रा याने, तर शाळेची प्रेअर लिहीली आहे जावेद अख्तर यांनी आणि या प्रेअरचे म्युझिक कंपोझ केलं आहे शंकर-एहसान-लॉय यांनी. या शाळेची वार्षिक फी १२ ते १५ लाख रुपयांदरम्यान आहे. पण या शाळेत प्रवेश मिळविणे इतके सोपे नाही. सामान्य लोक तर सोडाच पण अनेक सेलिब्रिटींच्या मुलांनाही शाळेच्या ॲडमिशनसाठी वेटिंग लिस्टमध्ये टाकण्यात येते. ॲडमिशनसाठी मुलांचा इंटरव्ह्यू तर होतोच पण त्यांच्या पालकांचीही मुलाखत घेतली जाते. या शाळेत ॲडमिशन घेण्यासाठी लाखो मुले अप्लाय तर करतात, पण त्यातून काही मोजक्याच मुलांना रूभाई अंबानी इंटरनॅशनल स्कूल मध्ये प्रवेश मिळतो. त्यातही जुने विद्यार्थी आणि स्कूल स्टाफच्या कुटुंबाला जास्त प्राधान्य मिळते. स्टारकिड्सनी भरलेल्या या शाळेत शिकवण्यासाठी शिक्षकांना त्यांच्या अनुभवानुसार दोन ते सात लाख रुपयांदरम्यान पगार मिळतो अशी माहिती समोर आली आहे. या शाळेच्या लायब्ररीमध्ये सुमारे ४० हजार पुस्तके आहेत. तर शाळेत एकूण ६० क्लासरूम आहेत. मुलांसाठी वेगवेगळ्या खेळांसाठी २.३ एकरचे मैदान असून, अनेक डिजिटल सुविधाही विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत.

# मां के साथ खेतों में मजदूरी की, ८०० रुपये महीना में काटे दिन...

# अब सेना में अफसर बना हरियाणा का छोरा

**सक्सेस स्टोरी**

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

' सफलता की राह में अक्सर रूकावटें तो आती ही हैं, पर यहां मंजिल भी उन्हीं को मिलती है जो हार नहीं मानते। ' हरियाणा के हरदीप गिल ने इस फेमस लाइन को सच साबित करके दिखाया दिया है। बचपन में पिता को खोना, मां के साथ खेतों में मजदूरी और सर्विस सेलेक्शन बोर्ड में लगातार ८ असफलता... किसी भी इंसान का हौसला तोड़ने के लिए काफी है। लेकिन सेना में जाने का जज्बा और किसान मां का संघर्ष ही था जिन्होंने हरदीप को सेना में अफसर बन दिया। उनकी सक्सेस स्टोरी आज उन युवाओं के लिए प्रेरणा हैं जो जिंदगी में कुछ बनना चाहते हैं।



### २ साल के हरदीप और ३ बहनों को छोड़कर चले गए थे पिता

हरियाणा के जींद जिले में उचाना के पास अलीपुर गांव के रहने वाले हरदीप का जीवन संघर्ष और मेहनत से भरा हुआ है। वह महज २ साल के थे जब उनके पिता का निधन हो गया। तब उनकी मां संत्रों देवी ने हरदीप और उनकी तीन बहनों को अकेले पाला। चार बच्चों की सिंगल मदर के लिए यह आसान नहीं था, लेकिन उन्होंने बच्चों की परवरिश के लिए कड़ी मेहनत की।

### ८०० रुपये महीना में काटे दिन

हरदीप गिल की मां ने बच्चों की पढ़ाई के लिए दिन-रात एक कर दिया। वे सुबह जल्दी उठकर खेतों में मजदूरी और दोपहर में एक स्कूल में मिड-डे मिल वर्कर काम करतीं। उन्हें ८०० रुपये महीना मिलते थे, जिससे परिवार का खर्चा चलता था। उनके पास जमीन का छोटा-सा टुकड़ा भी है, जिससे ज्यादा कुछ नहीं मिलता। जैसे-तैसे उन्होंने गांव के स्कूल में हरदीप का दाखिला कराया।

### पढ़ाई के साथ मां के साथ खेतों में काम किया

खराब आर्थिक स्थिति ने छोटी-सी उम्र में ही हरदीप को अपनी जिम्मेदारियों का एहसास करा दिया था। उन्होंने मां के साथ खेतों में जाना शुरू कर दिया। वे दिन में खेतों में काम करते और दोपहर के बाद पढ़ाई करते। उन्होंने गांव के स्कूल से ही १० वीं और १२ वीं क्लास तक पढ़ाई पूरी की।

### सेना में जाने का जुनून

१२ वीं क्लास के बाद हरदीप के सिर सेना में जाने का जुनून सवार हो गया। उन्होंने इंडियन एयर फोर्स एयरमैन की नौकरी के लिए अप्लाई किया। लेकिन चयन प्रक्रिया के दौरान छोटी-छोटी कमियों के चलते सेलेक्शन नहीं हो पाया। फिर भी उन्होंने हार नहीं मानी। इंडियन एक्सप्रेस को दिए इंटरव्यू में उन्होंने बताया कि मैंने उन कमियों को ठीक किया और फिर से कोशिश की। जब एयरमैन पद के लिए करीब ३००० युवाओं का सेलेक्शन हुआ तो मैं ऑल इंडिया मेरिट लिस्ट में ५९ वें नंबर पर था। तभी अग्निपथ योजना के चलते सबकुछ बदल गया और ज्वॉइनिंग लेटर नहीं आया।'

### एसएसबी के ९ वें अटेंप्ट में बने लेफ्टिनेंट

निराश-हताश हरदीप ने आगे की पढ़ाई आयजीएनओयू से करने का मन बनाया, फिर भी उनका एक लक्ष्य था सेना में जाने का। आयजीएनओयू से ग्रेजुएशन करने के बाद उन्होंने फिर से कोशिश की। उन्होंने कंबाइंड डिफेंस सर्विसेज एग्जाम दिया। हरदीप ९ वीं बार में सर्विसेज सेलेक्शन बोर्ड एग्जाम में सफल हुए।

ऑल इंडिया मेरिट लिस्ट में ५४ वां स्थान पाकर साल २०२४ में भारतीय सैन्य अकादमी (आयएमए) में शामिल हुए। दिसंबर २०२५ में अपनी गर्वित मां की मौजूदगी में पासिंग आउट परेड में मार्च किया। लेफ्टिनेंट हरदीप गिल सिख लाइट इन्फैंट्री की १४ वीं बटालियन में शामिल होंगे। लेफ्टिनेंट हरदीप की कहानी कड़ी मेहनत, लगन और अपनी काबिलियत पर विश्वास की कहानी है।

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिंगबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिंगबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# स्मृती मानधनाच्या डायटेशियनने अखेर सर्वच सांगितले

## आईच्या आनंदासाठी.....काय केला मोठा खुलासा?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

स्मृती मानधनाच्या साखर खाण्याच्या सवयीबद्दल तिच्या डायटिशियनने मोठा खुलासा केला आहे. स्मृती केवळ आईच्या आनंदासाठी गोड खाते. अन्यथा तिला साखरेची इच्छा नसते. हळूहळू साखरेची इच्छा कशी कमी होते आणि निरोगी आयुष्यासाठी साखर कमी करण्याचे सोपे उपायही डायटिशियनने सांगितले आहेत.

साखर खाणे आरोग्यासाठी चांगले नाही असे हेल्थ एक्सपर्ट नेहमी सांगतात. ज्या लोकांना साखर खाण्याची सवय आहे, अशांना तर साखर सोडणे म्हणजे महाकठिण काम असते. साखरेने आजार जडतो. वजन वाढते. त्यामुळे असंख्य क्रिकेटर्स आणि बॉलिवूड कलाकार साखर खात नाहीत. तसे ते जाहीरपणे सांगतही असतात. स्मृती मानधनासुद्धा गोड खात नाही. मात्र, आईच्या आनंदासाठी ती खात असते. स्मृती मानधनाच्या डायटिशियने तिच्या गोड खाण्याच्या सवयीबद्दल पहिल्यांदाच खुलासा केला. सर्व काही सांगितले. त्यामुळे स्मृतीच्या गोड खाण्यामागचे रहस्य समोर आले आहे.

एका युट्यूब चॅनलला स्मृती मानधनाने तिच्या गोड खाण्यावर भाष्य केले होते. ती म्हणाली, की असे नाही की मी काहीही खाते. मात्र, साखर अशी गोष्ट आहे, की मी ती पूर्णपणे सोडू शकत नव्हते. आता साखर खाण्याची इच्छा होत नाही. फक्त आईच्या आनंदासाठीच मी साखर खाते. अन्यथा मी साखर खात नाही.

**सांगलीत असते तेव्हा...**

जेव्हा सांगलीत असते किंवा एखादा सण उत्सव किंवा महत्वाचा कार्यक्रम असतो, तेव्हाच मी साखर खाते. मी माझ्या आईच्या आनंदासाठी खाते. तिला बरे वाटते. मला खूप आवड आहे किंवा गोड खाण्याची इच्छा होतेय म्हणून मी खात नाही. माझी आई नेहमी मला नवीन रेसिपी बनवून खाऊ घालते. समजा जिलेबीची नवीन डिश बनवली तर ती मला खायला देते. मी सांगलीत नसेल आणि टूर नसेल तर एखाद दोन जिलेबी खाते, असेही तिने सांगितले.

**इच्छा कशी कमी झाली ?**


स्मृतीची गोड खाण्याची इच्छा कशी काय कमी झाली याची माहिती अखेर समोर आली आहे. स्मृतीची डायटेशियन आणि डायबिटीज एज्युकेटर कनिका मल्होत्रा यांनी सांगितले आहे, की एखाद्याची साखर खाण्याची इच्छा हळूहळू कमी होते. ती ब्रेन रिवार्ड सिस्टिममधील न्यूरोप्लास्टिसिटीमुळे होते. हळूहळू साखर डोपामीन रिसेप्टरची संवेदनशीलता कमी करतो. म्हणजे तुम्ही साखर खाणे कमी करता त्यामुळे मेंदूला जो आनंद मिळतो तो हळूहळू कमी होतो. हळूहळू तुमच्या गटाचा मायक्रोबायोम बदलून जातो. त्यामुळे फायबर आणि कॉम्प्लेक्श कार्ब खाणारे गुड बॅक्टेरिया वाढतात. त्यामुळे हळूहळू साखर खाणे कमी करणे सोपे जाते, असे कनिका मलहोत्रा यांनी सांगितले.

**तुम्ही काय करू शकता?**

जेव्हा तुम्ही त्रस्त असता तेव्हा खाण्याकडे जाणे स्वाभाविक असते. पण इमोशनल ईटिंगला ट्रिगर समजून त्याला कमी केले जाऊ शकते. म्हणजे बिना साखरेचा चहा घ्या. फ्रुट्स वा नट्स खा. कुटुंबातील सदस्यांशी संवाद साधा. वॉक करा. कधी तरी कमी प्रमाणात साखर खा. जर साखर खाणे संपूर्णपणे बंद कराल तर साखर खाण्याची तीव्र इच्छा वाढेल.

# 'हाय पॉवर' हेडलाईट्समुळे अपघातांचा धोका

## प्रादेशिक परिवहन विभाग, वाहतूक शाखेचे दुर्लक्ष



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महामार्गासह प्रमुख राज्यमार्ग व ग्रामीण रस्त्यांवर रात्रीच्या वेळी प्रवास करणे दिवसेंदिवस धोकादायक ठरत आहे. चारचाकी व सहाचाकी वाहनांपासून कार, खासगी प्रवासी बस गाड्या, ऑटो रिक्षा, मालवाहतूक करणारे ट्रक, टँकर तसेच मिनी ट्रकसारख्या लहान व्यावसायिक वाहनांमध्ये कंपनीने दिलेल्या प्रमाणित हेडलाईट्स ऐवजी हाय-पॉवर एलईडी व एचआयडी लाईट्स बसवण्याचा ट्रेंड मोठ्या प्रमाणात वाढला आहे. परिणामी या लाइट्सच्या तीव्र प्रकाशाने समोरील वाहनचालकाचे नियंत्रण सुटून अपघातांचे धोके वाढले आहेत. वाहतूक शाखेचे पोलीस व प्रादेशिक परिवहन विभागाने कारवाईची गरज आहे. हेड हेडलाईट्स तीव्र प्रकाशझोतातून समोरून येणाऱ्या वाहनचालकांचे क्षणात लक्ष विचलित होते. वाहनावरील नियंत्रण सुटते. भीषण अपघाताच्या अनेक घटना घडल्या आहेत. विशेषतः राष्ट्रीय महामार्गावर २४ तास वाहतूक सुरू असते. रात्रीच्या वेळी समरून येणाऱ्या अवजड वाहनांवरील बेकायदेशीर व तीव्र प्रकाशझोत थेट समोरच्या चालकाच्या डोळ्यांवर पडतो. या हेडलाईट्सची क्षमता प्रमाणित मर्यादेपेक्षा अधिक असल्याने रस्त्यावरील दुभाजक, पादचारी व इतर वाहनचालक स्पष्टपणे दिसत नाहीत.

**चालकांची डोकेदुखी वाढली!**

शहरांतर्गत रस्त्यांवर धावणारे ऑटो रिक्षा व मिनी ट्रक, काही दुचाकी आदी वाहनांवर लावण्यात आलेले अति क्षमतेचे हेडलाईट्स दुचाकी तसेच इतर लहान वाहनांच्या चालकांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहेत. शहराच्या अंतर्गत व नवीन वसाहतीकडे जाणाऱ्या रस्त्यांपासून ते महामार्गापर्यंत ही अवस्था आहे. परिवहन विभाग व स्थानिक वाहतूक पोलीस याकडे दुर्लक्ष करतात असे आरोप प्रवासी, स्थानिक दुचाकीस्वार व नागरिकांकडून केला होत आहे.

### कारवाईची मागणी

महामार्ग आणि इतर प्रमुख रस्त्यांवर रस्ते सुरक्षा पूर्ववत करण्यासाठी परिवहन विभाग व वाहतूक पोलिसांनी तपासणी मोहीम राबवण्याची आवश्यकता आहे. अनधिकृत व थोकादायक हेडलाईट्स काढून टाकण्याची सक्ती करणे आवश्यक आहे. प्रमाणित हेडलाईट्स बसवण्यास वाहनधारकांना भाग पाडावे. बेकायदेशीर लाइट्सची विक्री व बसवणाऱ्या दुकानदारांवरही कठोर कारवाई करण्याची गरज आहे.



# चिमणपुरी- पिंपळेत किशोरवयीन मुली, महिलांची आरोग्य तपासणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील जानवे प्राथमिक आरोग्य केंद्र व मंगरूळ उपकेंद्रांतर्गत चिमणपुरी-पिंपळे खुर्द येथे किशोरवयीन मुली व महिलांचे आरोग्य तपासणी शिबिर झाले. या शिबिरात ११ ते ४९ वयोगटातील मुली व महिलांची हिमोग्लोबिग तपासणी करण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करणवाल, जिल्हा आरोग्य अधिकारी सचिन भायेकर, तालुका आरोग्य अधिकारी गिरीश गोसावी यांच्या मार्गदर्शनात हे शिबिर झाले. वैद्यकीय अधिकारी डॉ. संजय रनाळकर, डॉ. रिया शिसोदे, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. हेमंत कदम, प्रयोगशाला तंत्रज्ञ आकाश माळी, आरोग्य सहाय्यक युवराज पाटील, आरोग्यसेवक सी. एम. पाटील, आरोग्यसेविका रेखा परदेशी, प्रथम लोकनियुक्त महिला सरपंच सौ. वर्षा युवराज पाटील, उपसरपंच मीना पाटील, ग्राम पंचायत सदस्य, ग्रामसेवक के. के. लंकेश व आशासेविका साधना पाटील, आशाबाई पाटील, सामाजिक कार्यकर्ते युवराज पाटील, सुदाम पाटील आदींनी सहकार्य केले.



# तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

**ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत.** खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# एकाच षटकात ७ वाईड, गौतम गंभीर संतापला

## सामना संपल्यानंतर अर्शदीप सिंग समोर येताच...




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दुसऱ्या टी-२० सामन्यात दक्षिण आफ्रिकेने भारतावर विजय मिळवत पाच सामन्यांच्या टी- २० मालिकेत १- १ अशी बरोबरी केली. भारत आणि दक्षिण आफ्रिकेत सध्या पाच सामन्यांची टी- २० मालिका सुरू आहे. पहिल्या टी-२० मध्ये भारतीय संघाने विजय मिळविला होता. त्यानंतर दुसऱ्या टी-२० सामन्यात दक्षिण आफ्रिकेने भारतावर विजय मिळवत मालिकेत १- १अशी बरोबरी केली. भारताची गोलंदाजी खूप निराशाजनक राहिली. वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगने तर स्वतःच्या नावावर लाजिरवाणा विक्रम केला. ११ व्या षटकात अर्शदीपने तब्बल ७ वाइड चेंडू टाकले. त्यामुळे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर चांगलाच संतापला होता.

भारतासाठी टी- २० क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट्स घेणारा गोलंदाज असलेल्या अर्शदीपने या सामन्यात तब्बल १३ चेंडूची एक ओव्हर टाकली आणि १८ धावा दिल्या. अर्शदीपची ही कामगिरी पाहता सामना सुरु असताना मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर चांगलाच संतापला होता. या दरम्यानचा व्हिडीओही सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. आता सामना संपल्यानंतर अर्शदीप सिंग आणि गौतम गंभीरचा व्हिडीओही समोर आला आहे. यावेळी गौतम गंभीर आणि अर्शदीप सिंग हात मिळवताना दिसले.

# बांगडी, पैंजण, जोडवे घालणे आरोग्यासाठी फायदेशीर


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सोन्याचे दागिने उष्णता आणी चांदीचे दागिने थंड परिणाम देतात. कंबरेच्या वरिल भागात सोन्याचे दागिने आणी कंबरेच्या खालील भागात चांदीचे दागिने घातले पाहिजेत. हा नियम पाळल्याने शरीरातील उष्णता आणी शितलतेचे संतुलन राहते. बांगडी, पैंजण आणि जोडवे घालणे हे केवळ सौभाग्याचे प्रतिक नाही, तर ते आरोग्यासाठी फायदेशीर आहे.

**बांगडी घालण्याचे फायदे**

बांगडी मनगटावर घासली जाते त्यामुळे हाताच रक्तसंचार वाढतो. हे घर्षण उर्जा निर्माण करते. त्यामुळे अशक्तपणा जाणवत नाही. बांगडी घातल्याने श्वासासंबंधी व हृदयासंबंधी आजार होण्याची शक्यता कमी होते. बांगडी घातल्याने मानसिक संतुलन उत्तम ठेवण्यास मदत होते. तुटलेली बांगडी घालुन नये, याने नकारात्मक उर्जा वाढते.





**जोडवे घालण्याचे फायदे**

विवाहित स्त्रिया पायातल्या तीन बोटांमध्ये जोडवे घालतात. हा दागिना केवळ श्रृंगाराची वस्तु नाही. दोन्ही पायात जोडवी घातल्याने शरीरातील हार्मोनल सिस्टिम योग्यरित्या कार्य करते. जोडवी घालण्याने थायरॉईडचा धोका कमी होतो. जोडवी ॲक्युप्रेशर उपचार पद्धतीवर कार्य करतात. ज्यामुळे शरीरातील खालील अंगाचे मज्जासंस्था आणी स्नायु मजबूत होतात. जोडव्यांमुळे एका विशिष्ट रक्तवाहिनीवर दाब निर्माण होत असल्यामुळे गर्भाशयाला रक्तपुरवठा सुरळीतपणे चालू राहतो. या प्रकारे जोडवी स्त्रियांची गर्भधारणा क्षमता निरोगी ठेवते व मासिक पाळी ही नियमित होते.

**पैंजण घालण्याचे फायदे**

पैंजण पायातुन निघणारी शारीरिक विद्युत उर्जा शरिरात संरक्षित ठेवते. पैंजण स्त्रीयांचे पोट आणी त्यांच्या शरीरातील खालील भागातील फॅट्स कमी करण्यात मदत होते. वास्तुशास्त्रानुसार पैंजणातून येणाऱ्या स्वराने नकारात्मक उर्जा दूर होते. चांदीच्या पैंजणामुळे पायाचे घर्षण होऊन पायाचे हाड मजबूत होते. पायातील पैंजणामुळे महिलांची इच्छा शक्ती मजबूत होते. याच कारणामुळे स्त्रिया स्वतःच्या आरोग्याची काळजी न घेता कुटुंबाच्या सगळ्या गरजा पुर्ण करण्यात दिवस घालवून देते. पायात सोन्याचे पैंजण घालू नये. याने शारीरिक उष्णतेचे संतुलन बिघडून आजार होण्याची शक्यता असते.






# महाभारताचा नायक कोण ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कुणी म्हणतात श्रीकृष्ण, कुणी म्हणतात अर्जुन. एखादा आधुनिक पंडित दुर्योधनाला तो मान देतील, पण असे वाटते, की त्याचा नायक आहे अश्वत्थामा. तो मनुष्य जातीचा प्रतिनिधी आहे. म्हणूनच अश्वत्थामा चिरंजीव झाला आहे, होय, अश्वत्थामा हा या जगात सदैव एकाकीपणाने राहावे लागणाऱ्या मानवाचा आहे. दारूण दुःखाखेरीज, क्रूर वंचनेखेरीज, कधीही न संपणाऱ्या आयुष्याच्या मार्गावर त्याला दुसरा कुणी सोबती मिळाला नाही. आई, बाप, मित्र, सारे-सारे त्याचे अंतर्वैरी झाले. महाभारतात त्याच्या पत्नीचा उल्लेख नाही; पण ज्या अभाग्याला आई-बापांचेही खरेखुरे प्रेम मिळाले नाही त्याला देऊन पत्नी काय देणार? केवळ शरीरसुख. बालपणीच आईने त्याला फसवले. पीठात पाणी घालून दूध म्हणून तिने ते त्याला पाजले. आपल्या नागड्या-उघड्या गरिबीवर पांघरून घालण्यासाठी तिने ते केले असेल. पण आयुष्याचे विराण वाळवंट करणाऱ्या दाहक सत्याकडे तिने त्याला उघड्या डोळ्यांनी पाहू दिले नाही, हे खरे आहे. फार-फार मोठा अपराध होता हा तिचा. नंतर त्याची वंचना केली ती द्रोणाचार्यांनी-प्रत्यक्ष त्याच्या



पित्याने. द्रुपदाचा सूड घेण्याकरिता आणि आपला मोठेपणा सिद्ध करण्याकरिता द्रोण हस्तिनापुराला गेला. कौरव-पांडवांचा गुरू झाला. अर्जुनासारखा शिष्य आपण घडविला, या अहंकारात अश्वत्थामाचा त्याला विसर पडला.

निदान धर्मराज म्हणून मिरविणाऱ्या पहिल्या पांडवाने तरी त्याला फसवायला नको होते. सत्यवादी म्हणून रात्रंदिवस त्याच्या नावे खंडात डांगोरा पिटला जात होता. पण स्वार्थापायी धर्म अंधळा झाला. अश्वत्थामा मारला गेला. अशा आरोळ्या उठताच द्रोणाने धर्माला विचारले, की कोण मारला गेला? माझा मुलगा अश्वत्थामा-का हत्ती अश्वत्थामा? धर्माने उत्तर दिले, नरोवा कुंजरोवा. यातील शेवटचे शब्द ऐकू न जातील, इतक्या अस्फुट स्वरात उच्चारण्याची खबरदारी त्या महात्म्याने घेतली.

दुर्योधनानेही त्याला असेच फसवले. युद्धात विजय मिळण्याचा संभव होता, तोपर्यंत त्याने अश्वत्थामाच्या हाती सूत्रे दिली नाहीत, मात्र केवळ शेवटच्या निर्घृण भीषण युद्धाकरिता छिन्न-भिन्न होऊन धुळीत पडलेल्या त्या राजाने या द्रोपुत्राला सेनापतीपदाचा अभिषेक केला. बिचारा सेना नसलेला सेनानायक झाला. अश्वत्थाम्याने दुर्योधनाला दिलेले वचन खरे केले. पांडव आमरण विसरणार नाहीत, असा त्यांचा सूड घेतला. त्या सुडाचे प्रायश्चित्त त्याला एकट्याला भोगावे लागले. त्याच्या मस्तकातला मनी हिरावून घेतला गेला. तेथे कायम वाहणारी जखम निर्माण झाली. जगातील प्रत्येक अभागी मनुष्य एखादी अशीच जखम सोबतीला घेऊन जीवन कंठीत असतो.

ही भयानक जखम मस्तकी धारण करून चिरंजीवाचा शाप भोगीत अश्वत्थामा रानोमाळ भटकत आहे. या भ्रमंतीतही बिचारा एकाकी आहे. त्याच्या या दुःखात त्याची पत्नी सहभागी झाली, असा महाभारतात कुठेही उल्लेख नाही. आपल्या दुर्दैवी पतीला साथ देत तिनेही देह ठेवला असता, तर सीता-सावित्रीपेक्षाही ती अधिक वंद्य झाली असती. पण व्यासाच्या उत्तुंग प्रतीभेला सुद्धा अशा पत्नीची कल्पना करता आली नाही.

एकच प्रश्न मनाला सारखा बोचत राहतो. क्षणभरही चैन पडू देत नाही. अश्वत्थामाच्या वाट्याला हा सारा भोग का यावा? दारुण दुःखातून मुक्त होण्याचा मृत्यू हा सुलभ मार्ग असतो; पण त्याच्या लेखी हा चोर दरवाजा सुद्धा बंद करण्यात आला, तो का?



# मनुका संकुचित देहातील साठलेली मधुरता..!

**ग्लोबल महातेज वृतत्तसेवा**

साधे मनुके पाहताना प्रथम जाणवते ती त्यांची संकुचित, सुरकुतलेली अवस्था. मात्र ज्याला त्यांचा अनुभव आहे त्याला माहीत असते, की या संकुचित देहातच मधुरतेचा साठा दडलेला आहे. मनुका म्हणजेच मानवी जीवनाचे आध्यात्मिक प्रतीक आहे.

**द्राक्ष ते मनुका तपस्येचा प्रवास**

द्राक्ष जेव्हा सूर्यताप सहन करते, पाणी गमावते, स्वतःला आकुंचन पावू देते तेव्हाच ते मनुका बनते. हा बदल नुकसानीचा नसून परिपक्कतेचा असतो. अध्यात्मही असेच आहे. जीवनातील दुःख, कष्ट, उपेक्षा, अपमान हे सर्व जर सहन केले, तरच व्यक्ती अंतर्मुख होते. जे वाहून गेले, त्यातूनच जे शिल्लक राहते तेच सार असते.

**बाह्य सौंदर्य नाहीसे, अंतर्गत गोडवा प्रकट**

द्राक्षाचे सौंदर्य बाह्य असते. मनुक्याची गोडी अंतर्गत असते. ज्याचे जीवन केवळ बाह्य यश, मान-सन्मान, अपेक्षा यावर आधारित असते. ते जीवन द्राक्षासारखे असते क्षणभंगुर. मात्र ज्याने संयम, त्याग, उपेक्षा आणि वैराग्य स्वीकारले त्याचे जीवन मनुक्यासारखे होते. थोडे दिसते, पण फार देते.

**उपेक्षा संकुचन नव्हे, सारसंरक्षण**

मनुका बनताना द्राक्ष दुर्लक्षित होत नाही. ते स्वतःला आत ओढते. तसेच अध्यात्मात उपेक्षा म्हणजे पलायन नव्हे, तर स्वतःकडे परत येणे होय. अपेक्षा गळून पडतात, अहंकार सुकतो आणि आत्मरस गाढ होतो.

**शास्त्रीय दृष्टिकोन**

उपनिषद सांगतात, की ' अल्पे सुखं, बहु दुःखं ' जे बाह्य विस्तारात सुख शोधते त्याला दुःख मिळते. जे अंतर्गत संकुचन स्वीकारते त्याला आनंदाचा रस मिळतो. मनुका आपल्याला हे शिकवते, की कमी असण्यातही पूर्णता असते. गमावण्यातही प्राप्ती असते. उपेक्षेतही गोडवा असतो ' जीवन जेव्हा सुकते, तेव्हाच आत्मरस प्रकटतो.'

# श्री नृसिंह सरस्वतींची जन्मभूमी कारंजा लाड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

विदर्भातील वाशीम जिल्ह्यात ' कारंजा लाड ' नावाचे एक प्राचीन नगर आहे. स्कंद पुराणातील पाताळ खंडात याचे महात्म्य वर्णिलेले आहे. ब्रह्मर्षी वसिष्ठांच्या ' करंज ' नामक शिष्यवर्याचे हे तपास स्थान आहे. शिवपूर्वकाळापासून वैभवसंपन्न असलेले हे स्थान भगवान श्री दत्तात्रय यांचे द्वितीय अवतार श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराज यांचे जन्मस्थळ आहे.

भगवान श्री दत्तात्रय यांचे प्रथम अवतार असलेल्या श्रीपाद श्रीवल्लभ स्वामी महाराजांच्या जीवन कालामध्ये अंबिका नावाच्या एका ब्राह्मणीवर त्यांचा कृपानुग्रह घडला होता. श्रीगुरूंच्या उपदेशाप्रमाणे तिने आयुष्यभर शनीप्रदोष व्रताचे आचरण केले. ' पुढच्या जन्मी श्रीपाद श्रीवल्लभ स्वामी महाराजांसारखा पुत्र आपल्या पोटी जन्माला येणार '; या श्री गुरुवचनाचा ध्यास मनात बाळगून एके दिवशी ती पंचतत्त्वात विलीन पावली.

पुढे कारंजा येथे वाजसनेयी शाखेच्या एका ब्राह्मणाच्या कुळात तिचा जन्म झाला. आई-वडिलांनी तिचे नाव ' अंबाभवानी ' असे ठेवले व प्रेमाने तिचे संगोपन केले. मुलगी विवाहयोग्य झाली तेव्हा कारंजा नगरीतील ' माधव ' नावाच्या एका शिवव्रती ब्राह्मणाशी त्यांनी तिचे थाटामाटात लग्न करून दिले. दोघेही परस्परांना अत्यंत अनुरूप होते. चक्रवाक पक्षांप्रमाणे ते एकमेकांवर प्रेम करीत. लग्नानंतर दोघेही नेमाने अगदी भक्तिपूर्वक शिवपूजन करीत असत. पूर्वजन्मीच्या संस्कारांमुळे अंबाभवानी शनिप्रदोषाची पूजा ही करत असे. तिचा पती माधव हा सुद्धा या व्रताचरणात आनंदाने सहभागी होत असे. याप्रमाणे शिवपूजन आणि प्रदोष व्रताचरणात मग्न असलेली अंबा यथाकाल गर्भवती झाली. तिला उत्तम डोहाळे लागले ती ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी बोलू लागली. सातव्या महिन्यात घरच्यांनी तिला सीमंती संस्कार केला, तिला औक्षण केले. सुहासिनींना वाणे दिली. होता होता नऊ महिने पूर्ण झाले. अंबाभवानीच्या प्रसूतीची वेळ जवळ आली. शके १३०० च्या पौष्य शुद्ध द्वितीयेला, शनिवारी माध्यानी अंबा भवानी प्रसूत झाली. एका अत्यंत सुलक्षणी, तेजस्वी, सुंदर पुत्राला तिने जन्म दिला. श्रीपाद श्रीवल्लभ स्वामी महाराजांनी कुरवपुरामध्ये अंबिकेला दिलेल्या वचनाची पूर्तता केली. ते स्वतः अंबा भवानीच्या पोटी जन्माला आले आणि अलौकिक घडले. जन्मल्याबरोबर रुदन करण्याऐवजी बाळाने अगदी स्पष्टपणे 'ओंकाराचा' उच्चार केला. सगळीकडे



ही वार्ता पसरली. लोक चकित झाले. माधवाने ज्योतिषांना प्राचारण केले. त्यांनी बालकाची कुंडली पाहिली आणि अत्यंत उत्साहाने सांगू लागले, की " अतिशय चांगल्या मुहूर्तावर जन्मलेले हे बालक अवतारी पुरुष होईल. हा पुत्र अनेकांना गुरू होईल. याला अष्ट सिद्धी वश असतील. हा प्रपंच विरहित राहील. त्रिभुवनांत सर्वांना पूज्य राहील. याच्या दर्शनाने पतीत लोक पावन होतील. याच्या शब्दाने, अनुग्रहाने लोकांचा उद्धार होईल. या बालकाच्या रूपाने मोठ्या ऐश्वर्याचा ठेवाच तुमच्या घरी आला आहे. त्याची पावले जणू चिंतामणीच आहेत. " एवढे सांगून त्या विद्वान ज्योतिषांनी त्या बालकाला वंदन केले. ते सर्व ऐकून, आई-वडिलांनी त्या बाळाला दृष्ट लागू नये म्हणून त्याच्यावरून लिंबलोण ओवाळून उतरले आणि मीठ मोहऱ्यानी त्याची दृष्ट काढली. दहा दिवस झाल्यावर आई-वडिलांनी मुलाचे नाव ' शाळीग्राम ' असे ठेवले. त्याचप्रमाणे नक्षत्र पाहून ' नरहरी ' असे त्याचे आणखी एक नाव ठेवले.

या मुलखावेगळ्या बाळाला कुठे ठेवू आणि कुठे नको असे अंबा मातेला होत असे. दिसामासाने बाळ वाढत होता. त्याचे लोभस खेळ पाहताना ती स्वतःला विसरून जात असे. पदराआड घेऊन त्याला वारंवार पाजत असे. पोट भरले की ते मातेच्या मुखाकडे पाहून बाळ गोड हसत असे. घटका दोन घटका गेल्या की पुन्हा पदराआड शिरत असे. त्याच्या या वेल्हाळ चाळ्यांत गुंतून गेलेल्या अंबा मातेला वाटू लागले की, " आपले दूध त्याला पुरते की नाही ? बाळाचे पोट भरले नाही तर ते वाढणार कसे ? याला पाजायला आणखी एक कोणी दाई पाहावी का ? " मग तिने आपल्या मनातील शंका आपल्या पतीला सांगितली. चूळबुळ करणाऱ्या बाळाला बोलता बोलता तिने पुन्हा पदराआड घेतले; आणि एक नवल घडले. बाळाने आपल्या उजव्या हाताने आईच्या स्तनांना स्पर्श केला. त्याबरोबर आईला इतका पान्हा फुटला की तिचे वस्त्र भिजले. स्तनातून दूध अक्षरशः वाहू लागले. बाळ चुरुचुरु दूध पिऊ लागले. या अलौकिक प्रकाराने अंबा आणि माधव आश्चर्यचकित झाले; त्या बाळाला दृष्ट लागू नये म्हणून ही घटना त्यांनी गुप्त ठेवली. बाळ सहा महिन्यांचा झाला. पण तो पाळण्यात फारसा राहत नसे. नेहमी जमिनीवरच खेळायचा, पुढे सरकारचा, रंगायचा. बघता बघता नरहरी बाळ एक वर्षाचा झाला. पण तो ओंकारा व्यतिरिक्त कोणताही शब्द उच्चार येत नसे. बाळ मोठा होत होता; पण केवळ ओम शब्दा शिवाय काहीच बोलत नव्हता. माता-पित्यांना त्याची काळजी वाटू लागली. हा मुका तर नाही ना अशी शंका वाटू लागली. त्यांनी त्याबद्दल ज्योतिषांना विचारले. तेव्हा त्यांनी 'कुलदेवतेची आराधना करावी आणि रविवारी पिंपळाच्या पानावर वाढून ते तीन वेळा त्याला भरवावे', असे उपाय सुचवले. बाळाने बोलण्यासाठी त्यांनी ज्यांनी ज्यांनी जे जे उपाय सांगितले ते ते करून झाले; पण बाळ काही बोलेना. एखादा शब्द बोलायला शिकवावा तर तो हसून ' ओम ' एवढाच शब्द उच्चार असे.

# दत्त जयंतीपासून रोज औदुंबराला पाणी घाला; तना-मनाचे आरोग्य मिळवा!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सनातन धर्मात वृक्षांचे महत्त्व सविस्तरपणे सांगितले आहे. हिंदू धर्मात पिंपळ, तुळशी, वड, शमी यांसारख्या अनेक झाडांना आणि वनस्पतींना अतिशय आदराचे स्थान आहे. असे मानले जाते, की वनस्पतींमध्ये औषधी तसेच दैवी गुण असतात. या झाडांपैकी एक झाड आहे उंबराचे. त्यालाच आपण औदुंबर असेही म्हणतो. १४ डिसेंबर रोजी दत्त जयंती होती. त्यानिमित्त औदुंबराच्या झाडाला रोज पाणी घालण्याचे फायदे काय असतात ते जाणून घेऊया. भगवान विष्णू यांनी नृसिंहावतारात हिरण्यकश्यपूचा वध उंबऱ्यावर बसून केला. त्याच्याशी झालेल्या लढाईत नृसिंहाला जखमा झाल्या व नखांना विषबाधा झाली. त्यामुळे त्याने नखे उंबराच्या खोडात खुपसून विषबाधेचे शमन केले. लक्ष्मी मातेने उंबराची फळे वाटून त्याचा लेप नृसिंहाच्या जखमांना लावल्यामुळे त्या जखमांना होणारा दाह थांबला. या झाडाचा संबंध शुक्र ग्रहाशी आहे. कुंडलीतील शुक्र ग्रह बलवान होण्यासाठी उंबराच्या झाडाशी संबंधित काही उपाय फायदेशीर ठरू शकतात. असे मानले जाते, की उंबराच्या झाडाला नियमित पाणी घातल्यास किंवा त्याखाली दिवा ठेवल्यास तुमच्या कुंडलीत शुक्र ग्रह बलवान होतो. यासोबतच पैशांशी संबंधित समस्या दूर होतात. वास्तविक शुक्र हा संपत्ती आणि ऐषोआरामाचा ग्रह मानला जातो. असे म्हटले जाते, की ज्याच्या कुंडलीत शुक्र मजबूत स्थितीत असतो त्याला धन आणि ऐश्वर्य यांची कधीही कमतरता नसते. पण ज्याच्या कुंडलीत शुक्र कमकुवत असतो तेथे दारिद्र्य, आर्थिक समस्या आणि तंगी कायम राहते.



शुक्र ग्रहाचे पाठबळ मिळण्यासाठी उंबराच्या झाडाच्या सुकलेल्या काड्या होमहवनात समिधा म्हणून अर्पण करतात. ' ओम शम शुक्राय नमः ' या मंत्राचा जप करत उंबराच्या काठ्या वापरून यज्ञ केला असता कुंडलीतील शुक्र ग्रह बलवान होण्यास मदत होते. दत्तकृपेसाठी या झाडाची पूजा केली जाते.

**समृद्धीसाठी उपाय**

शक्य असल्यास रोज, नाहीतर दर गुरुवारी औदुंबराला पाणी घालावे. ११ प्रदक्षिणा घालाव्यात. या झाडाखाली बसून ' अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ' या मंत्राचा जप करावा. घरात सुख-शांती राहते. ज्योतिष शास्त्रानुसार प्रेमविवाहात अडथळे येत असतील किंवा जमीन-संपत्तीशी संबंधित समस्यांपासून मुक्ती मिळवायची असेल, तर त्यासाठी मार्गशीर्ष तथा कोणत्याही महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या शुक्रवारी उंबराच्या झाडाला पाणी घाला आणि तेथील थोडीशी माती आणून आपल्या घरातल्या कुंडीत टाका. मानसिक स्वास्थ्यासाठी रोज सकाळी अर्धा तास औदुंबराच्या पारावर चिंतन-नामःस्मरण करा. महिनाभरात तुम्हाला मनःस्वास्थ्य सुधारत असल्याचे लक्षात येईल. मात्र त्यात सातत्य महत्त्वाचे आहे. उंबराच्या झाडाच्या सहवासात प्राणवायू मिळतो. दुपारच्या वेळी थंड सावली मिळते. आरोग्याच्या दृष्टीने उंबर अत्यंत गुणकारी असल्याने त्याचे सान्निध्य सर्वार्थाने चांगले आहे.



# धनुर्मासारंभ..!

**ग्लोबल महातेज वृतत्तसेवा**

धनुर्मास म्हणजेच धुंधुरमास मंगळवार, दि. १६ डिसेंबरपासून सुरू झाला आहे. सूर्य धनू राशीत प्रवेश करतो तेथून सूर्य मकर राशीत प्रवेश करतो. तोपर्यंतचा काळ हा धनुर्मास म्हणून ओळखला जातो. यास धुंधुरमास असेही म्हणतात. याला धुंधुरमासाबरोबर झुंझुरमास अथवा शून्यमास असेही म्हणतात.

असे म्हणतात, की दक्षिणायनचे सहा महिने देवतांची रात्र असते. उत्तरायणाचे सहा महिने देवतांचा दिवस असतो. हा धुंधुरमास देवतांचा ब्रह्ममुहूर्त म्हणजेच त्यांची पहाट असते. या मासात लग्नकार्ये, प्रॉपर्टी खरेदी इत्यादी शुभकार्ये करत नाहीत. हा संपूर्ण महिना आपल्या देव-देवतांप्रती अर्पण असतो. सूर्योदयापूर्वी भल्या पहाटे ४ ते ६ या ब्रह्ममुहूर्तात उठून स्नान करून देवाची पूजा-अर्चा, आराधना, भजन अशी आपापल्या परीने भक्ती करतात. या मासात विशेष करून भगवान विष्णूंची व भगवान श्रीकृष्ण यांची आराधना करतात. तसेच वसुंधरेला व चराचराला जीवन व आरोग्य प्रदान करणारी प्रत्यक्ष देवता सूर्याची आराधना केली जाते. या आरतीला काकड आरती असे म्हणतात. यावर्षीचा धुंधुरमास १६ डिसेंबरला सुरू होऊन तो मकर संक्रांतीपर्यंत म्हणजेच १४ जानेवारी २०२६ पर्यंत राहील. इंग्रजी अगर मराठी कॅलेंडरमध्ये या महिन्याचा स्वतंत्र उल्लेख जरी केलेला नसला, तरी या धुंधुरमास महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व असून, हा हेमंत व शिशिर ऋतूमध्ये येतो. मराठी महिन्यानुसार मार्गशीर्ष, पौषमध्ये व इंग्रजी महिन्यानुसार डिसेंबर मध्यापासून जानेवारी मध्यापर्यंत असतो. धुंधुरमास कॅलेंडरमध्ये सापडणार नाहीच. हा प्रकार पूर्वी अधिकाधिक शेतकरी लोक पाळायचे. म्हणजे थंडीच्या दिवसांत लवकर सूर्य उगवायच्या सुमारास पूर्ण आवरून शेतात जायचे. शेकोटीच्या उबेत मुगाच्या डाळीची खिचडी, बाजरीची भाकरी, वांग्याची भाजी, भरीत, कांदा, लोणी किंवा तूप असा बेत जेवायचा. वांगी, लोणी पचायला जड असते तर बाजरीची भाकरी उष्ण असल्याने थंडीत चालते. खिचडी पचायला हलकी असते. म्हणून त्याबरोबर मुगाच्या डाळीची खिचडी असते. शेतात या सुमारास नवीन हुरडा आणि वांगी आलेली असतात. म्हणून वांगी अधिक खपतात. नाहीतर गवार, मटार, गाजर, वांगी अशी मिश्रभाजीही बनवितात. त्याला लेकुरवाळी भाजी असेही म्हणतात. साधारणपणे थंडीच्या दिवसांत जठराग्नी व्यवस्थित पेटलेला असतो (पावसाळा आणि उन्हाळ्याच्या तुलनेत). त्यामुळे जड पदार्थ खाल्ले तरी सहज पचतात आणि अंगी लागतात. जेवण तसे जास्तही जाते. म्हणूनच थंडीत म्हणजे जानेवारी महिन्यात संक्रांत, भोगीच्या काळात धुंधुरमास करतात. अनेक ठिकाणी धुंधुरमासात गुळाच्या पोळ्याही खातात. त्याही पचायला जड असतात. गावाजवळील निसर्गरम्य वातावरणात आपल्या मित्रमंडळींना वनभोजनाची तयारी करून एके दिवशी सकाळी एकत्र बोलवायचे व गप्पांचा फड जमवत थंडीमध्ये पोषक ठरतील, अशा पदार्थांचा आस्वाद घेण्याची पहाटेच्या वनभोजनाची ही प्रथा आता अस्तंगत होत आहे. कालौघात बदलत्या दैनंदिन जीवनशैलीमुळे आपल्याला हा धुंधुरमास साजरा करणे शक्य होत नाही. हळूहळू तो विस्मृतीत जाऊ लागला आहे. हल्ली काही हॉटेलमध्ये या जुन्या पण आजच्या जगातही अत्यंत उपयुक्त अशा पारंपरिक खाद्यसंस्कृतीचा आदर, त्याचा सन्मान करून हा धुंधुरमास साजरा करतात.